# प्राचीन खुणा



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ऑप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Ancient Landmarks)

# प्राचीन खुणा

परमेश्वर म्हणतो, “चवाठ्यावर उभे राहून पाहा आणि पुरातन मार्गांपैकी कोणता म्हणून विचारा;
सन्मार्गाने चाला; अशाने तुमच्या जिवास विश्रांती मिळेल;” पण ते म्हणाले, ‘आम्ही चालणार नाही.’
यिर्मया 6:16

# अनुक्रमणिका


1. आमच्या सभोवतालचे जग बदलत आहे 1

2. संपूर्ण ख्रिस्ती जगतात बदलाचे वारे वाहत आहेत 5

3. प्राचीन खुणा काय आहेत? 8

4. आमच्या प्राचीन खुणा 15

5. कार्यस्थळासाठी प्राचीन खुणा 24

6. समर्पणासाठी पाचारण 34

# 1
# आमच्या सभोवतालचे जग बदलत आहे

“प्राचीन खुणा” हा संदेश मी काही काळपासून आपल्या हृदयात बाळगला आहे, जो आता मी या पुस्तकाद्वारे तुमच्याशी सामायिक करीत आहे. हा शक्यतः असा संदेश आहे जो मी माझ्या शेवटच्या संदेशांपैकी एक म्हणून प्रचार करेन, अर्थात पुढील पीढीला आपला अधिकार सोपवितांना जी माझी धाव पुढे सुरू ठेवील. हा संदेश मुख्यत्वेकरून बँगलोरसारख्या, सर्व प्रकारच्या लोकांचे वास्तव असलेल्या, शहरातील शहरी चर्चला संबोधित करतो, आणि कदाचित भारतातील लहान गावांतील किंवा खेड्यांतील वाचकांसाठी समर्पक नसेल.

## आम्ही ज्याप्रकारे जगतो त्यात बदल

जर आपण वयस्कर लोक आणि 1984 व 2001 या दरम्यान जन्मलेल्या पीढींत तुलना केली, आम्हास असे आढळून येईल की आपण अशा अनेक गोष्टींची यादी तयार करू शकतो जी आम्ही ज्या जगात वाढलो त्याच्या उलट आहे:

- आमच्या वेळी काळापांढरा टीवी(TV) आणि एकच चॅनल होते—दूरदर्शन. या काळातील मुले पोगो, एनबीसी(NBC), एमटीवी(MTV), स्टार वर्ल्ड इत्यादींसोबत लहानाची मोठी झाली आहेत. मीडिया जग बदलत आहे. ही मुले मीडियावर फोफाटत आहेत.
- आम्ही स्पूल्स आणि रेकार्ड्ससोबत वाढलो. त्यांची वाढ डीव्हीडी(DVD), एमपी4(MP4) प्लेयर्स, आणि आयपॅडसह झाली

आहे. त्यांच्यापैकी अनेकांनी कधीही रेकॉर्ड पाहिला नसावा.

- ते अम्बॅसॅडर्स, प्रीमियर पदमीनी, मारोती, टाटा, बिडला इत्यादीं सोबत वाढले. त्यांची वाढ होन्डा, टोयोटा, बीएमडब्ल्यू(BMW), मायक्रोसॉफ्ट, आयबीएम(IBM), गूगल इत्यादींसोबत झाली.
- आमची वाढ थम्स अप, बजल, आणि फॅन्टासोबत झाली. ते कोक, डायट कोक, आणि पेप्सी यांच्यासोबत लहानाचे मोठे झाले.
- आम्ही स्थानिक "मील्स रेडी" कामत रेस्टॉरेन्टमध्ये कॉफी घेत असू. ते कॅफे कॉफी डे मध्ये कॉफी घेतात.
- आमच्या घरी एक डायल फोन असला, तर ती एक मोठी गोष्ट असे. शेजारचे लोक कधी कधी फोन करायला घरी येत. त्यांची वाढ पीडीए(PDA), एसएमएस(SMS) इत्यादींसोबत होत आहे. त्यांच्यापैकी अनेकांनी कधीही फोन डायल केला नसेल आणि कधी कदाचित करणारही नाहीत!
- मी कॉलेजपर्यंत कम्प्युटरवर कधीही काम केले नाही, आणि जेव्हा मी जवळजवळ 20 वर्षांचा होऊ लागलो तेव्हा मी मोठ्या मुश्किलीने माझे पहिले पॉवर पॉईन्ट प्रेजेन्टेशन तयार केले. माझा मुलगा जेव्हा 10 वर्षांचा होता तेव्हा त्याने पॉवर पॉईन्टमध्ये ॲनिमेटेड प्रेजेन्टेशन तयार केले, त्याच्या एमपी4(MP4) प्लेयरवर संगीत डाऊनलोड केले, तो गूगलवर सर्च करू लागला, आणि विकीपेडियावर संशोधन करतो. माझी मुलगी रूथ जी त्यावेळी सात वर्षांची होती, त्यावेळी या गोष्टींपेक्षा फारशी दूर नव्हती, ती आपल्या भावाकडून शिकत होती!
- जेव्हा आम्ही खेळत असू, तेव्हा आमचे मित्र आमच्या मार्गावरील मुले असत. आजची किशोरवयीन मुले विश्व समुदायात राहतात जी त्वरित संदेश पाठविणे, ब्लॉग, फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर,

आणि इतर सोशल नेटवर्किंग साईट्सशी जुळलेली आहेत. आपण जगभरातील मित्रांशी गेम खेळू शकतो किंवा चॅट करू शकतो!

आमची किशोर मुले आणि लहान मुले ज्या जगात वाढत आहे—ज्या जगात आता आम्ही आहोत—आम्ही ज्या जगात वाढलो त्यापेक्षा अगदी वेगळे आहे. तरूण मुले आणि लहान मुले स्वदेशी आहेत—ते या नवीन जगात वाढली किंवा वाढत आहेत! आम्ही या नवीन जगात स्थलांतरित झालेले आहोत.

## आमच्या शहरातील बदल

### *मजूरी किंवा वेतन*

पूर्वी, साडे पाच वर्षे खूप अभ्यास केल्यानंतर आणि शक्यतः आणखी काही वर्षे विशेषता प्राप्त केल्यानंतर, डॉक्टरला कदाचित रूपये 3,000 वेतनाने सुरूवात होत असे. नंतर, कॉल सेंटरमध्ये कॉलेज सोडलेला विद्यार्थी जवळजवळ 15000 रुपये कमावू लागला!

### *सुपरमार्केट ते शॉपिंग मॉलपर्यंत*

जेव्हा आम्ही मोठे होत होतो, तेव्हा आम्ही सामान्यतः सुपरमार्केटमध्ये किंवा शॉपिंग संकुलात खरीदी करीत असू, तेथे बोलण्यासारखे फारसे काही नव्हते. वातानुकुलन, एलिवेटर्स, अथवा एस्केलेटर्स नव्हते. आज, आमच्या शहरात वातानुकुलित, अनेक मजल्यांचे शॉपिंग मॉल आहेत ज्यात अंतर्राष्ट्रीय ब्रॅन्ड सहज उपलब्ध केले जातात.

याशिवाय, आम्ही जीवनशैलीत, जीवनावरील दृष्टिकोणात आणि इतर गोष्टींत अनेक बदल पाहतो.

## विश्वदृष्टीत बदल: आधुनिकवाद आणि पश्च-आधुनिकवाद

समाजशास्त्रज्ञ आम्हाला असे सांगतात की मागील 40 वर्षांत, तसेच

अलीकडील दशकांत, संस्कृती किंवा विश्वदृष्टी जागतिकरित्या स्थिरपणे बदलत आहे अथवा "आधुनिक" पासून "पश्च-आधुनिक" विचारात बदलत चाललेली आहे. आमच्यापैकी अनेक जण आधुनिक जगात वाढलेले आहे. आमची किशोरवयीन मुले आणि लहान मुले "पश्च-आधुनिक" विश्वदृष्टीत वाढत आहेत.

## *आधुनिकवाद*

आधुनिकवादाची सुरूवात प्रबोधनाने झाली. वैज्ञानिक पद्धत मापदंड होता. असे समजले जात असे की विज्ञान आणि बौद्धिक प्रामाणिकपणाच्या माध्यमाने, जागतिक समस्या सोडविता येतील. सत्य वस्तुनिष्ठ होते. सत्य स्वतः-प्रमाणित होते. सर्वत्र प्रामाणिकपणा होता. आधुनिकवादाचा नकारात्मक पक्ष होता व्यक्तिवाद आणि स्वकेंद्रितता.

## *पश्च-आधुनिक*

कारण नव्हे तर, सापेक्षतावाद मानक आहे. *"तथ्ये नाहीत, फक्त व्याख्या आहेत"*—फ्रेड्रिक नित्शे. नैतिकता सापेक्ष वस्तु आहे. तुम्ही स्वतःचे नैतिक मापदंड तयार करता ज्यानुसार तुम्ही जगू इच्छिता. तुम्ही व्यक्त करावयास स्वतंत्र आहात, आणि कोणीही तुम्हाला हे सांगू शकत नाही की तुमचे चुकले आहे. व्यक्तिगत अनुभव अनुभवजन्य पुरावा आणि वस्तुनिष्ठ सत्याची पायमल्ली करतो. सत्याशी तडजोड झाल्यानंतरही, सहिष्णुता हा एकमेव मार्ग आहे. देव म्हणजे तुम्हाला त्याला जे काही बनवायचे असेल तो.

आमची किशोरवयीन मुले आणि लहान मुले आव्हानात्मक जगात वाढत आहे. त्यांच्यापुढे निवड करण्यासाठी अनेक पर्याय आहेत, जीवनातील अतिशय महत्वपूर्ण गोष्टींसाठी सुद्धाः विश्वास मते, मूल्ये, आणि जीवनशैली.

# 2
# संपूर्ण ख्रिस्ती जगतात बदलाचे वारे वाहत आहेत

## चर्च चालविण्याच्या आमच्या पद्धतीत बदल

आपण ख्रिस्ती जगतात अनेक बदल पाहिले आहेत. उदाहरणार्थ, आम्ही चर्चच्या स्टेन्ड ग्लास लावलेल्या, मनोरेवजा इमारतींपासून वातानुकूलित सभागृह, अधिवेशन केंद्र इत्यादींपर्यंत गेलो आहोत. आम्ही गातो त्या गाण्यांमध्ये, आम्ही स्तोत्रांपासून कोरसापर्यंत आणि कोरसांपासून स्तुती आणि उपासनेच्या समकालीन गाण्यांमध्ये संक्रमण केले आहे. आम्ही स्तोत्रपुस्तकांपासून ते कोरस शीट ते ओव्हरहेड प्रोजेक्टर ते मोठ्या स्क्रीनवरील एलसीडी(LCD) प्रोजेक्टर ते एलसीडी(LCD) वाल्सपर्यंत देखील गेलो आहोत. सेवांमध्ये सादरीकरणे आता नाटक / नाटिका / संगीतापासून व्हिडिओ आणि लघुपटांपर्यंत वाढली आहेत.

## प्रचार करण्यात येत असलेल्या संदेशामध्ये बदल

सकारात्मक बाजूने पाहता, आम्ही देवाच्या वचनाचा वाढता समज पाहिला आहे. मार्टिन लूथरसोबत 1400च्या सुधारणेपासून, आम्ही बरेच लांब आलो आहोत, विशेषेकरून मागील 50 वर्षांत. देवाचे वचन जीवनाच्या सर्व क्षेत्रांसाठी प्रसंगोचित केले जात आहे. आणि तरीही जगभरातील पुलपिटमध्ये भयंकर गोष्टी घडत आहे. मोठ्या गर्दीस आकर्षित करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी, पाळक आणि सुवार्तिक, तडजोड न केलेले देवाचे वचन प्रचार करण्यापासून पश्च-आधुनिक तत्वज्ञान, बरे वाटणारे संदेश, प्रेरणादायक व्याख्याने या पर्यंत येऊन पोहोचले आहेत जे न केवळ रविवारच्या सकाळी देण्यात

येणाऱ्या मानसिक बडबडीपेक्षा वेगळे नाहीत. अशा पुलपिटमधील वचन आता दुधारी तलवार (इब्री 4:12), हतोडा किंवा अग्नी राहिलेला नाही (यिर्मया 23:29), पण प्राणासाठी गुळगुळीत संदेश आणि पहुडण्यासाठी आरामदायक पलंग ठरला आहे! ते पापाला तोंड देण्यास नाकार देतात किंवा लोकांना पाप कबूली करण्याप्रत नेत नाहीत. ते स्वर्ग किंवा नरकाच्या वास्तविकतेबद्दल बोलू इच्छित नाहीत! हे अशा प्रकारचे संदेश आहेत ज्याचा ते प्रचार करणार नाहीत, लोकांची संख्या कमी होईल अशी भिती त्यांना असते.

## संदेशाच्या प्रस्तुतीमध्ये बदल

आम्ही ज्या माहिती युगात आहोत, त्या दोन गोष्टी सहस्त्राब्दी पिढी आणि सामान्य लोकांचे वैशिष्ट्य दर्शवतात:

- ते आता फक्त ऐकू इच्छित नाहीत; त्यांना हवे की त्यांची सर्व ज्ञानेंद्रिये त्यात सहभागी व्हावी. त्यांना प्रवचन नको, परंतु असा अनुभव हवा ज्याचा परिणाम बदलात होईल.
- उपरोधिकपणे, वाढत्या माहितीसोबत, आम्ही अवधान कमी होतांना पाहत आहोत!

सकारात्मक पक्ष असा की, आम्ही अशाप्रकारे चर्चेसची आणि प्रचारकांची वाढती संख्या पाहत आहोत जे कालातीत सत्यास अशा पद्धतीने मांडत आहेत ज्यात सर्व ज्ञानेंद्रिये सहभागी होतात आणि बदल आणणारा अनुभव घडून येतो. तंत्रविज्ञान आणि सृजनशीलतेची यात मोठी भूमिका आहे. हे सर्वकाही चांगले आहे. आणि तरीही, दुसरीकडे, रचनात्मकरित्या गोष्टी करण्याकडे आणि मांडण्याकडे लक्ष्य इतके बदलले आहे की आपण “पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या” प्राचीन खुणा आणि चमत्कार, चिन्हे, अद्भुत कृत्ये—अलौकिक गोष्टींचे प्रदर्शन गमावून बसलो आहोत. आमच्या उपासना सभांचा शेवट अशा गोष्टींनी

होतो ज्याने प्राणाचे मनोरंजन होते, ज्याचा आनंद घेण्यासाठी हजारोंनी लोक येतात, पण आमच्या सभा त्यांस बदल घडवून आणणाऱ्या, आरोग्य देणाऱ्या, सुटका देणाऱ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यापासून त्यांस वंचित ठेवतात. आम्ही आमच्या पुलपिटवर अभिषिक्त प्रेषित, संदेष्टे, पाळक, आणि सुवार्तिक या ऐवजी इव्हेंट मॅनेजर, मनोरंजनकर्ते, वक्ते, नाटककार या सारख्या लोकांचे प्रभुत्व असण्याची जोखिम पत्करतो.

# 3
# प्राचीन खुणा काय आहेत?

**नीतिसूत्रे 22:28**
**तुझ्या पूर्वजांनी घातलेली** (सीमारेखा) **मेर सारू नकोस.**

**नीतिसूत्रे 23:10**
**जुनी मेर सारू नकोस; अनाथांच्या शेतात शिरू नकोस.**

जॉन गिलच्या संपूर्ण बायबलच्या व्याख्येनुसार, “प्राचीन खुणा” “प्राचीन सरहदी” किंवा “सीमेचा” उल्लेख करते; ज्याद्वारे जमीनी, इस्टेट, वारसा चिन्हांकित केला जात असे, बांधला जात असे; वेगळा केला जात असे; पूर्वज त्यांच्या शेजाऱ्यांशी करार करून ठरवित असत; जे दूर करणे कायद्याविरुद्ध मानले जात असे, आणि ज्यांनी ते केले त्यांना शाप दिला जात असे, आणि सुरवातीच्या काळात यास एक अतिशय जघन्य अपराध मानले जाई; रोमन लोकांमध्ये ही इतकी पवित्र गोष्ट होती, की त्यांचे एक दैवत होते जो त्या सीमांची देखरेख करीत असे आणि त्यावरून त्या सीमेस नाव मिळत असे.

**अनुवाद 19:14**
**तुला मिळणाऱ्या वतनात, म्हणजे जो देश तुझा देव परमेश्वर तुला वतन म्हणून देत आहे त्यात पूर्वीच्या लोकांनी ठरवलेली आपल्या शेजाऱ्याच्या सीमेची खूण सरकवू नकोस.**

**अनुवाद 27:17**
**जो आपल्या शेजाऱ्याच्या शेताच्या सीमेची खूण सरकवतो तो शापित असो.’ तेव्हा सर्व लोकांनी ‘आमेन’ म्हणावे.**

**होशे 5:10**
**यहूदाचे सरदार शेताची मेर सारणाऱ्यासारखे झाले आहेत; मी त्यांच्यावर पाद्ध ण्याप्रमाणे आपल्या क्रोधाचा वर्षाव करीन.**

नेते स्वतः प्राचीन खुणा हलविल्याबद्दल दोषी होते आणि त्यांच्यावर देवाचा न्याय ओढवला. आम्हाला हे माहीत आहे की "प्राचीन खुणा" हा शब्द आणि पूर्वी उल्लेखिलेला पवित्र शास्त्रातील परिच्छेद मालमत्तेवरील शाब्दिक सीमांशी संबंधित आहे, मी याचे भाषांतर आत्मिक गोष्टीमध्ये करू इच्छितो आणि त्याचा उपयोग पुस्तकासाठी पार्श्वभूमी म्हणून करू इच्छितो.

प्राचीन खुणा मागील पीढ्यांनी ठरविलेल्या सीमा आहेत ज्या दर्शवितात:

- सुरक्षित क्षेत्र जेथे चालता येते आणि प्रतिबंधित क्षेत्र ज्यात प्रवेश करता येत नाही.
- संभाव्य फसवणूक जी तुम्हाला प्रतिबंधित क्षेत्रांत घेऊन जाईल.

बदलत्या जगात, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, काही प्राचीन खुणा आहेत ज्या आपण हलविता कामा नये. काही पवित्र सीमा आहेत ज्या आपण ओलांडू नयेत. काही धार्मिक परंपरा आहेत ज्या आपण गमावता कामा नये.

## धार्मिक परंपरा ज्या आपण गमवू नये

हे खरे आहे की काही मानवनिर्मित परंपरा आहेत ज्या निरूपयोगी आहेत आणि त्या मोडून काढल्या पाहिजेत, परंतु काही धार्मिक, बायबल आधारित परंपरा आहेत त्या राखून ठेवल्या पाहिजेत. त्या समयातीत आहेत.

## *मानवनिर्मित परंपरा*

आम्ही अशा मानवनिर्मित परंपराचा त्याग करण्यास स्वतंत्र आहोत ज्या देवासोबत आमच्या चालचलणुकीत कुठलाही फायदा करीत नाहीत. मानवनिर्मित परंपरा आमच्या जीवनांत देवाचे वचन रद्द करतात आणि आम्हास फसवणुकीच्या ठिकाणी आणि बंधनात घेऊन जातात.

**मार्क 7:13**
**अशा प्रकारे तुम्ही आपला संप्रदाय चालू ठेवून देवाचे वचन रद्द करता आणि ह्यासारख्या आणखी पुष्कळ गोष्टी करता.**

**कलस्सै 2:8**
**ख्रिस्ताप्रमाणे नसलेले, तर माणसांच्या संप्रदायाप्रमाणे, जगाच्या प्राथमिक शिक्षणाप्रमाणे असलेले तत्त्वज्ञान व पोकळ भुलथापा ह्यांच्या योगाने तुम्हांला कोणी ताब्यात घेऊन जाऊ नये म्हणून लक्ष द्या.**

## *धार्मिक परंपरा*

तथापि, आपण हे समजले पाहिजे की काही धार्मिक परंपरा देखील आहेत ज्या आम्ही राखून ठेवल्या पाहिजेत.

**1 करिंथ 11:2**
**तुम्ही सर्व गोष्टींत माझी आठवण करता आणि मी तुम्हांला सांगून ठेवलेले विधी जसेच्या तसे दृढ धरून पाळता, त्याबद्दल मी तुमची वाहवा करतो.**

**2 थिस्सल 2:15**
**तर मग बंधूंनो, स्थिर राहा, आणि तोंडी किंवा आमच्या पत्राद्वारे जे संप्रदाय तुम्हांला शिकवले ते बळकट धरून राहा.**

**2 थिस्सल 3:6**
**बंधुजनहो, आम्ही आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने तुम्हांला आज्ञा करतो की, अव्यवस्थितपणे वागणाऱ्या व आमच्यापासून प्राप्त झालेल्या संप्रदायांप्रमाणे न चालणाऱ्या प्रत्येक बंधूपासून तुम्ही दूर व्हावे.**

# प्रसंगोचित असणे

काही प्राचीन खुणा आहेत ज्या आपण राखून ठेवल्या पाहिजेत, पवित्र सीमा ज्या ओलांडता कामा नये, धार्मिक परंपरा ज्या गमवू नये हे समजल्यानंतर, आता आपण एका अतिशय रोचक विषयाकडे, प्रसंगावधानाकडे येतो.

## *बदलत्या संस्कृतीमध्ये, नवीन जगात आपण प्रसंगोचित राहून प्राचीन खुणांत कशा राखून ठेवू शकतो?*

ख्रिस्ती वयस्क म्हणून, आपण नवीन जगाच्या संस्कृतीशी ज्यात आपण राहत आहोत, संघर्ष करतो. आपण अत्यंत वेगळ्या विश्वदृष्टीच्या आणि संस्कृतीच्या जगात वाढलो आहोत या तथ्यामध्ये भर म्हणून, आता आपणास हे माहीत नाही की अशी वचने कशी लागू करावी:

- जगात असणे आणि तरीही *"जगाचे नसणे"* याचा अर्थ काय (योहान 17:14-18)?
- आपण जगाशी कसे सुसंगत राहू शकतो आणि तरीही *"या जगाबरोबर समरूप होऊ नये"* हे कसे (रोमकरांस पत्र 12:1,2)?
- आपण जगाशी कसे जोडले जाऊ शकतो आणि तरीही *"जगाशी मैत्री करू नये"* (याकोब 4:4)?
- आपण जगावर प्रीती करता कामा नये, आणि तरीही आपण दररोजच्या जीवनाचा आनंद कसा घेतो व स्वतःचे रक्षण कसे करतो (1 योहान 2:15-17)?

या विषयाशी आपण संघर्ष करीत असतो.

आम्ही जाणतो की आम्ही जगाबाहेर राहू शकत नाही कारण आम्हाला जगात पाठविण्यात आले आहे. आम्ही नवीन जगाच्या संस्कृतीसोबत काय करतो ज्यात आम्ही स्वतःला पाहतो? आम्ही

जगाला कसा प्रतिसाद देतो? आम्ही आपल्या किशोरवयीन मुलांना आणि बालकांना नवीन जगात काय शिकवितो, ज्याची संस्कृती बदलत चालली आहे आणि ज्याच्या संस्कृतीशी आम्ही परिचित नाही?

- जर आम्ही नवीन जगाच्या संस्कृतीपासून विलग झालो, तर आम्ही तिच्यावर प्रभाव टाकू शकणार नाही, तिच्यात सुधारणा घडवून आणू शकणार नाही, किंवा तिच्यात बदल करू शकणार नाही.
- जर आपण नवीन जगाच्या संस्कृतीशी पूर्णपणे जुळवून घेतले, तर तिच्यात जे काही वाईट आहे ते आम्हाला बदलता येणार नाही.
- आम्हाला कालातीत सत्ये आणि तत्वे समजावून सांगण्यासाठी आणि स्थापित करण्यासाठी नवीन जगाच्या बदलत्या संस्कृती-चा शोध घेतला पाहिजे, ती समजून घेतली पाहिजे, आणि तिचा उपयोग केला पाहिजे.

संस्कृती चांगलीही नसते किंवा वाईटही नसते. तर त्याऐवजी प्रत्येक संस्कृतीत चांगली आणि वाईट तत्वे समावलेली असतात जी ओळखली पाहिजेत आणि बुद्धिमत्तेने त्यांच्याशी व्यवहार केला पाहिजे. देवाचे अंतःकरण कळवीत असतांना पौलाने खालीलप्रमाणे म्हटले आहे:

**1 करिंथ 9:19-23**

**19 कारण मी सर्वांपासून स्वतंत्र असताही अधिक लोक मिळवण्यासाठी स्वतःला सर्वांचा दास केले आहे यहूदी लोक मिळवण्यासाठी मी यहूदी लोकांना यहूद्यासारखा झालो;**

**20 नियमशास्त्राधीन लोक मिळवण्यासाठी मी नियमशास्त्राधीन नसता, त्यांना नियमशास्त्राधीनासारखा झालो. जे नियमशास्त्रविरहित आहेत त्यांना मिळवण्यासाठी, म्हणजे नियमशास्त्र नाही अशांना मी नियमशास्त्रविरहित असा झालो.**

**21 तरी देवाच्या नियमांबाहेर होतो असे नाही, तर ख्रिस्ताच्या नियमांच्या अधीन होतो.**

**22 दुर्बळांना मिळवण्यासाठी दुर्बळांना मी दुर्बळ झालो. मी सर्वांना सर्वकाही झालो आहे, अशा हेतूने की, मी सर्व प्रकारे कित्येकांचे तारण साधावे.**
**23 मी सर्वकाही सुवार्तेकरता करतो, अशासाठी की, मी इतरांबरोबर तिचा भागीदार व्हावे.**

1 करिंथ 9 मधून उद्‌धृत केलेली वचने शक्यतः सर्वात महत्वाचे परिच्छेद आहेत जे आम्हाला आमच्या श्रोत्यांप्रत प्रासंगिक राहण्याविषयी शिकवितात—सर्व मनुष्यांसाठी सर्वकाही बनणे. ज्यांची आपण सेवा करीत आहोत त्यांच्यासारख्या बनणे. जर पौलाला त्याच्या काळात ते आवश्यक वाटले, तर मला खात्री आहे की आम्ही देखील तसे केले पाहिजे!

**1 करिंथ 10:32,33**
**32 यहूदी, हेल्लेणी व देवाची मंडळी ह्यांच्यापैकी कोणालाही अडखळवणारे होऊ नका;**
**33 तर जसे मी सर्व गोष्टींत सर्वांना संतोषवतो आणि त्यांचे तारण व्हावे म्हणून स्वतःचे हित न पाहता पुष्कळ जणांचे हित पाहतो, तसे तुम्हीही करा.**

1 करिंथ 10:32,33 ही वचनें प्रेषित पौलाने 1 करिंथ 9:19-23 मध्ये ज्याची चर्चा केली त्याच्या प्रकाशात समजली पाहिजेत. सर्व गोष्टींत सर्व मनुष्यांस प्रसन्न करण्याचे पौलाचे कारण वैय्यक्तिक फायद्यासाठी किंवा लोकांना स्वतःकडे ओढण्यासाठी नव्हते, पण त्यांना ख्रिस्तामधील विश्वासाप्रत नेण्यासाठी होते.

*प्रासंगिकता म्हणजे जे कालातीत आहे त्याच्यासाठी संस्कृतीला जे म्हणावयाचे आहे त्याचा उपयोग करणे. जे कालातीत आहे ते म्हणण्यासाठी आपण जे सांस्कृतिक आहे त्याचा उपयोग केला पाहिजे*—रेगी जॉयनर, फॅमिली वाईजचे संस्थापक.

जग बदलत आहे. जे काल कामी येत होते, ते कदाचित आज चालणार नाही! आम्हाला नवीन जगाशी जुळवून घेतले पाहिजे.

आम्हाला नवीन जगाच्या संस्कृतीचा भाग असलेल्या प्रतीकांचा आणि भाषेचा उपयोग करून सार्वकालिक सत्ये मांडली पाहिजेत. आणि तरीही असे करण्यात जोखिम आहे, ज्याची आम्हास जाणीव ठेवली पाहिजे. आम्ही संस्कृतीमधून वाटेल त्याप्रकारे गोष्टी घेऊन त्यांचा उपयोग कालातीत सत्ये कळविण्यासाठी करू शकत नाही. नवीन जगाच्या संस्कृतीचा उपयोग करण्याच्या, तिच्यात सहभागी होण्याच्या प्रयत्नात आपण प्राचीन खूणांत तडजोड करू शकत नाही.

# 4
# आमच्या प्राचीन खुणा

मी बदलाच्या काही वाऱ्यांस संबोधित करू इच्छितो जे जीवनाच्या कित्येक महत्वपूर्ण क्षेत्रातून वाहू लागले आहेत आणि आम्हाला या क्षेत्रांतील प्राचीन खूणांचे स्मरण घडवून देतात:

- वैय्यक्तिक जीवन आणि चारित्र्य,
- विवाह आणि कुटुंब,
- कामाचे ठिकाण,
- चर्च जीवन आणि
- सेवाकार्य

काही वारे वाहत आहेत, आणि आम्हाला आमच्या तारणांचे शीड त्यांच्याशी जुळविण्याची आणि अनुकूल करण्याची आणि जेथे वारे वाहत आहेत तेथे जाण्याची गरज आहे, असे न केल्यास कदाचित आम्ही मागे राहून जाऊ आणि वर्तमान नवीन जगापासून विलग होऊ. आणि मग, बदलाचे काही वारे आहेत जे अशा दिशेत वाहत आहेत जे आम्हाला पवित्र मर्यादा ओलांडण्यास आणि भक्तिमान परंपरा सोडण्यास बाध्य करू पाहतील. आम्ही बदलाच्या वादळात आम्हाला सुरक्षित नांगर टाकता यावा म्हणून प्राचीन खुणांचा उपयोग करून बदलाच्या या वाऱ्यांतून आम्ही मार्ग काढण्यास शिकले पाहिजे.

या पुस्तकात बदलाच्या सर्व क्षेत्रांस आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांस संबोधित करण्याचा माझा हेतू नाही. माझा हेतू आहे पुरेशी बुद्धी आणि समज देणे, जेणेकरून आम्हास हे जाणून घेता येईल की वाहत

असलेल्या वाऱ्यांस किंवा पुढील वर्षांत आमच्या विरोधात येणाऱ्या वाऱ्यांस कसा प्रतिसाद द्यावा. मला प्राचीन खुणांतर्गत टिकून राहण्यास सक्षम व्हावे अशी इच्छा आहे—म्हणजे पवित्र मर्यादा ओलांडू नये व भक्तिमान परंपरा गमाविता कामा नये.

माझी इच्छा केवळ हीच नाही की आम्हाला बदलास योग्य प्रतिसाद देण्यास समर्थता प्राप्त व्हावी, पण मी आम्हाला हे आव्हान देण्याची देखील इच्छा धरतो की या प्राचीन खुणा आमच्या जगात घेऊन जाव्या—यासाठी की आम्हाला आमच्या जगाची ती क्षेत्रे बदलता यावीत जी बदलाच्या वाऱ्यांमुळे विस्कळीत होत आहेत. अशा लोकांची कल्पना करा जे उद्योगव्यवसायाच्या, शासनाच्या, शिक्षणाच्या, क्रीडेच्या, संचार माध्यमाच्या, मनोरंजनाच्या, फॅशनच्या क्षेत्रात आणि इतर सर्व बाबतीत प्राचीन खुणांनुसार जीवन जगतात. आपण खरोखर आमच्या जगात मीठ आणि प्रकाश ठरू!

येथे माझे पाचारण फक्त हेच आहे—**बायबलसोबत टिकून राहा**. बायबल **ही** आमची प्राचीन खूण आहे!

सत्य हे सापेक्ष नाही. सत्य हे परिपूर्ण आहे. देवाचे वचन सत्य आहे (योहान 17:17). आम्हास देवाने दिलेले निर्देश सापेक्ष नाहीत. ते परिपूर्ण आहेत. देवाला काय म्हणावयाचे आहे यावर आम्हाला मतदान करावयास मिळत नाही! देवाने जे म्हटले ते म्हटले आणि त्याच्या म्हणण्याचा जो अर्थ आहे तेच त्याने म्हटले. जे त्याने म्हटले त्याचे आम्ही अनुसरण करतो.

## वैय्यक्तिक जीवन आणि चारित्र्यासाठी प्राचीन खुणा

### *पावित्र्य*

**1 पेत्र 1:14-16**

**14 तुम्ही आज्ञांकित मुले व्हा आणि अज्ञानावस्थेतील आपल्या पूर्वीच्या**

**वासनांनुसार वागूवर्तू नका;**
**15 तर तुम्हांला पाचारण करणारा जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणात पवित्र व्हा;**
**16 कारण असा शास्त्रलेख आहे की, "तुम्ही पवित्र असा, कारण मी पवित्र आहे."**

**इब्री 12:14**
**सर्वांबरोबर 'शांततेने राहण्याचा'व ज्यावाचून कोणालाही प्रभूला पाहता येत नाही ते पवित्रीकरण मिळवण्याचा 'झटून प्रयत्न करा.'**

पवित्र होणे म्हणजे "देवासाठी वेगळे ठेवण्यात येणे." त्याचा अर्थ मी देवाचा आहे. म्हणून, मी जे काही म्हणतो आणि करतो त्याद्वारे देवाचे प्रतिनिधित्व घडले पाहिजे, ते भक्तिमान असले पाहिजे, त्याद्वारे भक्तिमानता प्रगट झाली पाहिजे.

आम्ही जे काही बोलतो, जे काही करतो, जे घालतो, इत्यादी, ह्या मापदंडाद्वारे आपण पारखले पाहिजे. आणि तरीही, पावित्र्याचे आमचे मापदंड आम्हाला अशा लोकांपासून वेगळे ठेवण्यासाठी नाहीत जे आमच्यासारख्या मापदंडाचे पालन करीत नाहीत. आम्हाला त्यांच्याशी व्यवहार करता आला पाहिजे, त्यांच्याद्वारे प्रभावित न होता.

हे लक्षात ठेवा की कर गोळा करणाऱ्यांसोबत आणि पापी लोकांसोबत बोलतांना आणि खातांना येशू अतिशय सहजपणे वागत असे (मत्तय 9:11). याचा अर्थ ते जे घालतात ते आम्ही काही प्रमाणात घालू शकतो, त्यांच्यासारखा वास ठेवू शकतो, त्यांच्यासारखे दिसू शकतो, आणि तरीही देवासमोर पवित्रतेचा आपला वैय्यक्तिक मापदंड आम्ही गमाविता कामा नये.

आम्ही जगाच्या कोणत्याही भागात का राहत असेना आणि कुठल्याही संस्कृतीचे पालन का करीत असेना, पावित्र्य ही प्राचीन खूण आहे!

पावित्र्याचे देवाचे मापदंड परिपूर्ण आहेत. ते सर्व मुलांसाठी सारखेच आहेत, मग आम्ही जगाच्या पाठीवर कोठेही का राहत असेना आणि कोणत्याही संस्कृतीत कार्य का करीत असेना. विश्वासणारे म्हणून, आम्ही आपल्या स्वतःच्या नैतिक मापदंडांची व्याख्या करू शकत नाही. त्यांची व्याख्या आमच्यासाठी देवाच्या वचनात स्पष्ट केलेली आहे. आम्हाला नैतिक सापेक्षवादाच्या पश्च-आधुनिक तत्वज्ञानाची जाणीव ठेवली पाहिजे जिने आमच्या मंडळीत प्रवेश केला आहे, त्या बिंदुपर्यंत जेथे काही असा प्रचार करतात आणि शिकवितात की आम्ही आपले स्वतःचे नैतिक मापदंड स्पष्ट करीत असतो आणि पावित्र्याचे मापदंड वेगवेगळ्या संस्कृतीत वेगवेगळे असतात. हे असू शकत नाही! जगाच्या कोणत्याही भागात बायबल सारखेच आहे आणि ते त्याच्या सर्व मुलांसाठी सारख्याच गोष्टी बोलते!

स्त्रियांनो, कृपा करून लक्षात ठेवा की ज्याप्रकारे तुम्ही पोशाख घालता त्यावरून दोन महत्वाच्या गोष्टी दिसून येतात—शालीनता आणि ईश्वरभक्ती.

**1 तीमथ्य 2:9,10**

**9 तसेच स्त्रियांनी स्वतःस साजेल अशा वेषाने आपणांस भीडस्तपणाने व मर्यादेने शोभवावे; केस गुंफणे आणि सोने, मोती व मोलवान वस्त्रे ह्यांनी नव्हे,**
**10 तर देवभक्ती स्वीकारलेल्या स्त्रियांना शोभते तसे सत्कृत्यांनी आपणांस शोभवावे.**

मला हे कळते की काही लोक असा वाद घालू शकतात की वस्त्र परिधान करण्यात शालीनतेची व्याख्या वेगवेगळ्या संस्कृतीत वेगवेगळ्या प्रकारे केली जाते. ते म्हणतील ज्याला एक संस्कृती अभद्र समजते ते दुसऱ्या संस्कृतीत पूर्णपणे योग्य असेल. माझा प्रतिसाद द्विपक्षीय असेल. सर्वप्रथम, पवित्र शास्त्र स्त्रियांस पाचारण करते की त्यांची *"अंतःकरणातील गुप्त मनुष्यपणाची अविनाशी शोभा असावी"* (1 पेत्र 3:4अ) जी देवाच्या दृष्टीत अतिशय मौल्यवान आहे. म्हणून

संस्कृतीची पर्वा न करता, विश्वास करणाऱ्या स्त्रीचे लक्ष्य हेच असले पाहिजे. दुसरे म्हणजे, ज्या संस्कृतीच्या संदर्भांतर्गत तुम्ही राहता त्यात शालीन असा.

## *सात्विकपणा*

**नीतिसूत्रे 10:9**
**सात्विकपणे चालणारा निर्भयपणे चालतो, कुटिल मार्गांनी चालणारा कळून येईल.**

आम्ही आमच्या जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात सात्विकपणा आणि प्रामाणिकपणा बाबत कुठलीही तडजोड करू शकत नाही. ही मर्यादा आहे जी आम्ही तोडू शकत नाही—मग परिस्थिती कितीही विकट का असेना.

## *अखंडत्व*

**नीतिसूत्रे 10:4**
**सैल हातांनी काम करणारा दरिद्री होतो, परंतु उद्योगाचा हात धन मिळवितो.**

लोकांना मिळालेल्या झटपट यशांमुळे आपण कधीकधी मोहित होतो. दुसऱ्या वेब बूमचा स्टार म्हणून ओळखला जाणारा फेसबुक डॉट कॉमचा संस्थापक, ज्याने हॉर्वर्ड सोडले तो 23 वर्षीय मार्क झुकरबर्ग, याची मिळकत हे पुस्तक लिहिण्याच्या वेळी 15 दशलक्ष आणि त्याहून अधिक आहे. फक्त एका चांगल्या कल्पनेने आणि अवघ्या चार वर्षांत त्याला जवळजवळ झटपट यश मिळाले!

झटपट यशाच्या गाथा ऐकणे आणि पाहणे कधीकधी आपल्याला अशा स्थितीत नेते जेथे आपण एक सोपा मार्ग शोधू लागतो. कठोर परिश्रम आता प्रासंगिक वाटत नाहीत. पण “प्राचीन खूण” असे सांगते की जर तुमचा हात सैल असेल तर तुम्ही गरीब व्हाल. कष्टाळू

व्यक्तीलाच यश मिळते.

विप्रोचे अध्यक्ष, अझीम प्रेमजी आठवड्यातून सरासरी 80 तास काम करतात असे म्हटले जाते हे तुम्हाला माहीत आहे का? जेव्हा त्यांच्या टीमचा हिस्सा बनविण्यासाठी कोणाचाही विचार करीत असतांना त्यांचा एक प्रश्न असतो, "तुम्ही आठवड्यातून किती तास देणार?" अध्यक्षासोबत प्रत्यक्षपणे काम करण्याची इच्छा धरणाऱ्याने आठवड्यातून 60-70 तास काम करावयास तयार असले पाहिजे! आम्ही गरजेपेक्षा जास्त काम करावे यासाठी मी आम्हां सर्वांना प्रोत्साहन देत नाही, पण मी हे समजवू इच्छितो की यश स्वस्त नाही!

## *प्राधान्य*

आमच्या प्राधान्यांस जगात सतत आव्हान मिळत असते जेथे दृष्टिकोण हा आहे की सर्वकाही सापेक्ष आहे आणि त्याची व्याख्या करता यावी.

मार्क 12:29-31 आणि मत्तय 6:33 ही वचने सारखीच आहेत आणि आम्ही जीवनात राखून ठेवाव्या अशा प्राधान्यांसाठी प्राचीन खुणा आहेत.

**मार्क 12:29-31**
**29 येशूने उत्तर दिले, सर्वांत पहिली ही की, 'हे इस्राएला, ऐक; आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे;'**
**30 आणि 'तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीती कर.'**
**31 दुसरी ही की, 'जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.' ह्यांपेक्षा मोठी अशी दुसरी कोणतीही आज्ञा नाही."**

**मत्तय 6:33**
**तर तुम्ही पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटा म्हणजे त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील.**

विश्वासणारे या नात्याने आमच्यासाठी देवाप्रत आमची प्रीती आणि राज्याच्या हेतूंचा पाठपुरावा करणे यादीमध्ये सर्वोच्च ठिकाणी आहे, आमच्या स्वतःच्या वैय्यक्तिक सुखांच्या, वैय्यक्तिक महत्वांकांक्षांच्या, आणि इतर गोष्टींच्याही वर आहे.

ज्या जगात माणसाचे मोल त्याच्याजवळ काय आहे याद्वारे मोजले जाते, आम्ही समजतो की आमच्याजवळ ज्या वस्तू आहे त्यापेक्षा आम्ही जे आहोत ते अधिक महत्वाचे आहे!

**लूक 12:15**
**आणखी त्याने त्यांना म्हटले, "सांभाळा, सर्व प्रकारच्या लोभापासून दूर राहा; कारण कोणाजवळ पुष्कळ संपत्ती असली तर ती त्याचे जीवन होते असे नाही."**

### *साक्ष*

आम्ही आपली साक्ष नेहमी राखून ठेविली पाहिजे. आमची साक्ष म्हणजे आमचे जीवन—आमची कृत्ये, आमच्या प्रवृत्ती, आणि आमची वागणूक—आमच्या सभोवतालच्या लोकासाठी काय बोलत आहे, आम्ही एक शब्दही बोलत नसतांना. आम्ही अशी साक्ष कायम ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे ज्याची निंदा होता कामा नये—असे जीवन जगा ज्यात कोणालाही दोष आढळता कामा नये. ज्या पद्धतीने आम्ही जीवन जगतो त्याद्वारे ज्याची आम्ही अनुसरण करतो त्याची प्रशंसा झाली पाहिजे (1 पेत्र 2:9).

## विवाह आणि कुटुंबासाठी प्राचीन खुणा

### *विवाह*

**इब्री 13:4**
**लग्न सर्वस्वी आदरणीय असावे व अंथरूण निर्दोष असावे; जारकर्मी व व्यभिचारी ह्यांचा न्याय देव करील.**

विश्वासणारे म्हणून आम्ही हे समजतो की विवाह ही देवाने ठरविलेली संस्था आहे. हा जन्मभराचा करार आहे. ही एक प्राचीन खूण आहे जी आम्ही हलवू शकत नाही. जे एकमेकांशी डेटिंग करतात, त्यांनी हे लक्षात ठेवावे की जोपर्यंत तुमचे लग्न होत नाही तोपर्यंत तुम्ही अविवाहित आहा! तुम्ही विवाहाच्या जवाबदारीत पाऊल टाकण्यापूर्वी विवाहितांच्या अधिकारांचा उपयोग करू शकत नाही. ज्यांचे लग्न झालेले आहे, त्यांनी हे लक्षात ठेवावे की तुमचे लग्न दोघांसाठी आणि फक्त दोघांसाठीच तयार करण्यात आले होते. आतले वर्तुळ राखून ठेवा.

## *कुटुंब*

कुटुंब ही देवाची योजना आहे. जेव्हा तुम्ही तुमच्या कुटुंबाची सेवा करता, तेव्हा तुम्ही देवाने ठरविलेली सेवा पार पाडता, देवाने ठरविलेल्या इतर सेवेसमान (प्रचार करणे, भविष्यवाणी करणे, किंवा चमत्कार करणे). म्हणून, आपल्या कुटुंबाप्रत सेवा प्राचीन खूण आहे जी आम्ही मिटवत नाही. आमच्या कुटुंबांत आपला वेळ आणि पैसा गुंतविण्यास आम्ही प्राधान्य देतो.

आम्ही विशाल कुटुंबामध्ये विश्वास ठेवतो ज्याचा विश्वासणारे या नात्याने आम्ही भाग आहोत (स्थानिक मंडळी), ही सुद्धा देवाने ठरविलेली आहे, आम्ही हे जाणण्याबाबत सावध असले पाहिजे की सीमारेखा कोठे आखण्यात आल्या आहेत. आम्ही आपल्या कुटुंबास विशाल चर्च समुदायात विसर्जीत होऊ देऊ शकत नाही.

## *आईबापाचा मान राखणे*

**नीतिसूत्रे 1:8,9**

**8 माझ्या मुला, आपल्या बापाचा बोध ऐक, आपल्या आईची शिस्त सोडू नकोस;**
**9 कारण ती तुझ्या शिराला भूषण, व तुझ्या गळ्याला हार अशी आहेत.**

आपल्या आईवडिलांचा मान राखणे, आदर करणे, आणि त्यांची सेवा करणे जुन्या काळासारखे वाटत असेल. विश्वासणारे म्हणून, आम्हाला देवाच्या वचनात असे शिकविण्यात आले आहे की आम्ही आईवडिलांचा मान राखावा (फिलिप्पैकरांस पत्र 6:1-3). ही एक ईश्वरीय परंपरा आहे जी आम्ही दूर करता कामा नये.

# 5
# कार्यस्थळासाठी प्राचीन खुणा

वैय्यक्तिक जीवन आणि चारित्र्यासाठी आम्ही ज्या प्राचीन खुणांची चर्चा केली त्याच कार्यस्थळासाठी देखील लागू आहेत. या प्राचीन खुणा तुमच्या व्यावसायिक जगात घेऊन जा. नवीन जगाच्या संस्कृतींमुळे या प्राचीन खुणांशी तडजोड करू नका.

## स्वातंत्र्य

आज, कर्मचाऱ्यांनी कार्यस्थळात स्वतःला संस्थेचा भाग समजावे म्हणून—फक्त "कामगार" म्हणून नव्हे, आपण सर्व प्रकारच्या पद्धतींचा आणि नाम पद्धतींचा उपयोग करतो. लोकांनी स्वतंत्र असावे तरीही काम करावे असे आम्हाला वाटते आणि कित्येक वेळा कर्मचारी स्वातंत्र्याचा शिस्तीचा अभाव असा चुकीचा अर्थ लावतात.

स्वातंत्र्य म्हणजे शिस्तीचा अभाव नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे जवाबदारीचा अभाव नव्हे. त्याचा अर्थ हे ठरविणे नाही की तुम्ही केव्हा कार्यालयात यावे आणि केव्हा जावे, किती वेतन मिळवावे, किती स्वतःवर खर्च करून त्या चा बिल कंपनीला द्यावा, त्याचा अर्थ तुम्ही कोणत्या होटेलात राहू इच्छिता हे ठरविणे नाही, यापैकी कोणतीही गोष्ट कार्यस्थळी स्वातंत्र्याचे प्रतिनिधित्व करीत नाही. कोणत्याही उत्तम संघटनेला या सर्व क्षेत्रांसाठी मर्यादा आणि निर्देशिकांची गरज आहे, नाहीतर मोठा गोंधळ माजेल. कार्यस्थळी खऱ्या स्वातंत्र्याचा संबंध अनावश्यक अडथळे किंवा हस्तक्षेपावाचून तुमच्या संस्थेसाठी उत्तम मूल्य निर्माण करण्यासाठी तुमच्या सर्व क्षमतांचा उपयोग करण्याकरिता भरपूर वाव मिळण्याशी आहे. त्याचा संबंध सर्जनशील कल्पना इतरांस देणे, ध्येय ठरविणे, आणि ते ध्येय पूर्ण करण्याच्या

पद्धती ठरविणे यांच्याशी आहे.

**इफिसकरांस पत्र 6:7**
**ही चाकरी माणसांची नव्हे तर प्रभूची आहे असे मानून ती सद्भावाने करा.**

## नैतिक सापेक्षवाद आणि परिस्थितीविषयक नीतिशास्त्र

कार्यस्थळात नैतिक सापेक्षवादात आणि परिस्थितीविषयक नीतिशास्त्रात विश्वास ठेवणाऱ्या पश्च-आधुनिक विश्वदृष्टीद्वारे व्यावसायिक आणि वैय्यक्तिक मूल्यांस आव्हान मिळत असते. योग्य आणि अयोग्य, काळे आणि पांढरे करड्या रंगांच्या छायेत विघटित झाले आहे. लाभ, योग्य संबंध, शीघ्र यश यासाठी मूल्ये, नीति, आणि सात्विकपणा यांची तडजोड केली जात आहे.

तरीही प्राचीन खुणा म्हणतात:

**नीतिसूत्रे 10:9**
**सात्त्विकपणे चालणारा निर्भयपणे चालतो; कुटिल मार्गांनी चालणारा कळून येईल.**

व्यावसायिकांनो, आम्ही आपल्या जगावर प्रभाव टाकला पाहिजे, फक्त त्याद्वारे प्रभावी होता कामा नये. मी तुम्हाला आव्हान देऊ इच्छितो. अंतर आणा; फक्त केवळ उपजीविका कमवू नका!

## चर्चच्या जीवनासाठी प्राचीन खुणा

### *संगीत*

समकालीन संगीत चुकीचे नाही. भक्तिगीतांसोबत नवीन पिढीस आवडणाऱ्या संगीताचा उपयोग करणे उत्तम आहे. आणि तरीही आम्ही गीतांविषयी सावध असले पाहिजे ज्यात संगीतास देवाचा अनुभव करण्यापेक्षा अधिक महत्वाचे समजले जाते.

**अनुवाद 31:19**
**आता तुम्ही हे गीत लिहून घ्या, हे इस्राएल लोकांना शिकवा; त्यांना हे तोडपाठ करायला लावा, म्हणजे ते इस्राएल लोकांविरुद्ध माझ्या वतीने साक्ष देईल.**

गीते लिहिली जावीत असे देवाला वाटण्याचे एक कारण हे आहे की आम्ही त्याचे आणि त्याने जे केले आहे त्याचे सतत स्मरण म्हणून त्याच्या लोकांस शिकवावे आणि त्यांच्या तोंडात त्याचे वचन टाकावे. आम्हास या प्राचीन खुणांवरून समकालीन गीतांचे मूल्यमापन करावे लागेल. गाणे देवाचा हेतू साध्य करण्यास मदत करते का?

तसेच, आपण विश्वासाच्या जुन्या उत्तम भक्तिगीतांकडे दुर्लक्ष करू नये. ही धर्मशास्त्राने भरलेली, विश्वास व्यक्त करणारी भक्तिगीते आहेत.

**इफिसकरांस पत्र 5:19**
**स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक प्रबंध ही एकमेकांना म्हणून दाखवा; आपल्या अंत्र तःकरणात प्रभूला गायनवादन करा.**

आमच्या प्रभूसाठी असलेल्या गायनवादनाची अभिव्यक्ती म्हणून प्रत्येकाची गरज आहे—स्तोत्रे, भक्तिगीते, आणि सुवार्ता गीते सर्वांची!

## *शिस्त*

अनेक पाळकांना आज मेंढपाळाच्या सोट्याचा उपयोग करण्याची भिती वाटते. प्रत्येक मेंढपाळ आपल्या मेंढरांस हिरव्या कुरणांत आणि शांत पाण्याजवळ नेतो, पण त्याच्या मेंढरांना मार्ग दाखविण्यासाठी आणि त्यांचे रक्षण करण्यासाठी त्याला आकडीची व काठीची गरज भासते.

वैद्यकीय जगतात आमच्याकडे "उपशामक निगा" म्हटलेला उपचार आहे, त्या लोकांसाठी जे गंभीरपणे आजारी आहेत. यामागे

त्यांचे शेवटचे दिवस शक्य तितके आरामदायक बनवण्याचा विचार असतो. ज्यांना शारीरिक कष्ट होत असेल त्यांच्यासाठी हे उत्तम आहे. तथापि, चर्च पापात असलेल्या आणि देवाच्या कृपेपासून वंचित असलेल्यांना उपशामक निगा देऊ शकत नाही (इब्री 12:15). येथे पृथ्वीवर जर आम्ही त्यांना आराम देतो आणि नरकात सर्वकाळ घालविण्यात त्यांची मदत करतो तर काहीही उपयोग नाही. त्याऐवजी मी सुरा काढून त्यांना पापात पाडणारा उजवा डोळा किंवा उजवा हात "कापून टाकण्याच्या" अस्वस्थ प्रक्रियेतून जाण्यात त्यांची मदत करेन (मत्तय 5:29,30). मंडळी, तुमच्या पाळकाला खरा मेंढपाळ होण्याची परवानगी द्या. त्याला त्याची आकडी आणि काठी वापरण्याची परवानगी द्या, कारण त्यांच्यावाचून तो मेंढरांचे मार्गदर्शन करू शकणार नाही, त्यांना सुधारू शकणार नाही, आणि त्यांचे रक्षण करू शकणार नाही.

**1 करिंथ 4:21**

**तुमची काय इच्छा आहे? मी तुमच्याकडे काठी घेऊन यावे किंवा प्रीतीने व सौम्यतेच्या आत्म्याने यावे?**

आम्ही विपुल कृपेत विश्वास ठेवतो, पण ईश्वरीय ताडनेत देखील विश्वास ठेवतो. आपण कृपेचे नावात ईश्वरभक्तिचे पालन करण्याचा त्याग करता कामा नये. अथवा शिक्षेचा अतिरिक्त वापर करून हे देखील विसरता कामा नये की देवाच्या कृपेवाचून आमच्यापैकी कोणीही तारण पावणार नाही!

## *पुढाऱ्यांप्रत अधीनता*

पश्च-आधुनिक जगात, "आदर," "मान," "अधीनता," आणि "आज्ञाधारकपणा" यांना वाईट शब्द म्हणून वागविले जाते! आणि या प्रवृत्तीने मंडळीत प्रवेश केला आहे.

येथे प्राचीन खूण आहे:

**इब्री 13:17**
**आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेत राहा व त्यांच्या अधीन असा; कारण आपणांस हिशेब द्यायचा आहे हे समजून ते तुमच्या जिवांची राखण करतात; ते त्यांना आनंदाने करता यावे, कण्हत नव्हे; तसे झाल्यास ते तुमच्या हिताचे होणार नाही.**

## सेवाकार्यासाठी प्राचीन खुणा

### *पोशाख*

पाळकांचा पोशाख घातलेल्या सुवार्तिकांपासून ते व्यासपीठाच्या मागे सूट किंवा अनौपचारिक कपडे घालण्यापर्यंत आम्ही खूप पुढे गेलो आहोत. केवळ त्यांच्या पोशाखांवरून प्रचारकांचा न्याय करू नका. ते लांडग्याच्या पोशाखात मेंढरे असू शकतात! त्यांचे जीवन, चारित्र्य, त्यांच्या संदेशाचा प्रामाणिकपणा आणि त्यांच्याद्वारे येणारा अभिषेक हे महत्त्वाचे आहे! जोपर्यंत आपण सेवाकार्यात प्राचीन खुणा राखतो तोपर्यंत अनौपचारिक कपड्यांमध्ये काहीही चुकीचे नाही!

### शिष्टाचार

मी आज ख्रिस्ती धर्मजगताच्या काही भागात जे पाहतो त्याबद्दल मी चिंतित आहे. शांत आणि अनौपचारिक होण्याच्या प्रयत्नात, प्रचारक आणि सेवक खरोखर सेवेतील नैतिक मानदंडांस कमी लेखतात. तुम्ही कल्पना करू शकता का की एखादा सुवार्तिक व्यासपीठावर उभा राहून दर आठवड्याला आपल्या पत्नीसोबत किती वेळा लैंगिक संबंध ठेवतो याविषयी बोलत आहे—फक्त त्याच्या मंडळीसमोर चांगला दिसण्यासाठी! चांगला दिसण्याच्या प्रयत्नात, सैल भाषा, स्वस्त विनोद आणि इतर अनेक वायफळ गोष्टींमुळे आपण व्यासपीठाचे पावित्र्य गमावले आहे.

सेवाकार्य सुरू केल्यापासून चार वेळा घटस्फोट घेतलेला माणूस

आणि सध्या त्याचे पाचव्यांदा लग्न झालेले आहे, तो टी व्ही सेवेसोबत पास्टर आणि प्रचारक म्हणून काम करीत आहे. आम्ही हे का सहन करतो?

सेवेत आणि आत्मिक नेतृत्वात असलेल्यांसाठी प्राचीन महत्त्वाची खूण अशी आहे:

**1 तीमथ्य 3:1-5**
**1 कोणी अध्यक्षाचे काम करू पाहतो तर तो चांगल्या कामाची आकांक्षा धरतो, हे वचन विश्वसनीय आहे.**
**2 अध्यक्ष अदूष्य, एका स्त्रीचा पती, नेमस्त, स्वस्थचित्त, सभ्य, अतिथिप्रिय, निपुण शिक्षक असा असावा.**
**3 तो मद्यपी व मारका नसावा; तर सौम्य, भांडण न करणारा, द्रव्यलोभ न धरणारा,**
**4 आपल्या घरची व्यवस्था चांगली ठेवणारा, आपल्या मुलाबाळांना भीडमर्यादेचे वळण लावून त्यांना स्वाधीन ठेवणारा असा असावा;**
**5 (कारण ज्याला आपल्या घरची व्यवस्था चांगली ठेवता येत नाही, तो देवाच्या मंडळीचा सांभाळ कसा करील?)**

असे दिसते की ख्रिस्ती जगतात, या मानकांकडे ज्या देवाने सेवेत असलेल्यांना दिलेल्या पूर्वापेक्षा आहेत, आपण दुर्लक्ष केले आहे. हे खरे आहे की सेवक हे केवळ मर्त्य मनुष्य आहेत आणि तरीही देवाने आपल्याकडून अपेक्षित असलेले मानदंड स्थापित केले आहेत. या प्राचीन खुणा आहेत ज्यांचे आपण उल्लंघन करू शकत नाही!

## ***संदेश***

प्रेषित पौलाकडून एक गंभीर इशाराः

पौल म्हणतो, *“पुष्कळ लोक देवाच्या वचनाची भेसळ करून ते बिघडवून टाकतात. आम्ही त्यांच्यासारखे नाही, तर जसे सात्त्विकपणाने व देवाच्या द्वारे बोलावे तसे आम्ही देवासमक्ष ख्रिस्ताच्या ठायी बोलणारे*

*आहोत"* (2 करिंथ 2:17).

"देवाच्या वचनात भेसळ करून ते बिघडविण्याचा" अर्थ काय? याचा अर्थ शब्द मिसळणे, नैतिक सापेक्षतावाद (काहीही परिपूर्ण नाही), आधुनिकोत्तर तत्त्वज्ञान, मानवतावाद आणि इतर "चांगल्या वाटतील" अशा कल्पनांसह भेसळ करणे, आपल्या प्रेक्षकांसाठी ते रुचकर बनवणे! आणि हे जगभरातील व्यासपीठांवर होताना दिसते. असे नाही की काही प्रचारक बायबलचा उपयोग करीत नाहीत आणि पवित्र शास्त्राचे उद्धरण घेत नाहीत. पण नवीन जगाशी सुसंगत होण्याच्या प्रयत्नात, काही जण अशा श्रोत्यांसाठी वचनाची भेसळ करतात जे आमच्याद्वारे त्या गोष्टी ऐकू इच्छितात ज्या त्यांना ऐकावयाच्या असतात!

**2 तीमथ्य 4:2-4**

**[2] वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा, सर्व प्रकारच्या सहनशीलतेने व शिक्षणाने दोष दाखव, निषेध कर व बोध कर.**

**[3] कारण ते सुशिक्षण ऐकून घेणार नाहीत, तर आपल्या कानांची खाज जिरावी म्हणून ते स्वेच्छाचाराने आपणांसाठी शिक्षकांची गर्दी जमवतील,**

**[4] आणि ते सत्य ऐकण्यापासून फिरतील, व कल्पित कहाण्यांकडे वळतील, अशी वेळ येईल.**

सदस्यत्व घेणाऱ्या लोकांच्या संख्येवरून आपण एखाद्या संदेशाच्या औचित्याचे मूल्यमापन करू शकत नाही. कोणताही उत्तम वक्ता गर्दीस आकर्षित करू शकतो. संदेशाची पारख करण्याची एकमेव पद्धत म्हणजे देवाच्या विनातडजोड वचनाच्या प्रकाशात त्याचे मूल्यमापन करणे.

येशूने देवाच्या राज्याचा संदेश मिळमिळीत केला नाही. त्याचा ऑल्टर कॉल होता: *"... दररोज स्वतःचा वधस्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे"* (लूक 9:23).

**योहान 6:66,67**
**66 ह्यावरून त्याच्या शिष्यांपैकी पुष्कळ जण परत गेले आणि ते पुन्हा कधी त्याच्याबरोबर चालले नाहीत.**
**67 म्हणून येशू बारा शिष्यांना म्हणाला, "तुमचीही निघून जाण्याची इच्छा आहे काय?"**

सर्व लोक येशूला सोडून गेले आणि शेवटी फक्त 12 शिष्य उरले, आणि येशूने त्यांना विचारले की ते देखील निघून जातील का.

तुम्हाला वाटले असेल की येशूने जो संदेश दिला त्यात तो अयशस्वी झाला, कारण त्याने प्रचार केल्यानंतर त्याचे श्रोते त्याला सोडून गेले (आपण लोकांच्या नकारात्मक प्रतिक्रियांद्वारे संदेशाची पारख करू शकत नाही—जर त्यांना सत्य सांगितलेले आवडत नसेल तर काय?) आणि तरीही आपल्याला माहीत आहे की लोकसमुदाय त्याच्या मागे आला कारण त्याचे शब्द हे पित्याचे शुद्ध वचन होते आणि तो पित्याची कामे करीत असे!

आपल्या संदेशात, आपण देवाच्या तडजोड नसलेल्या, भेसळ नसलेल्या वचनाचा प्रचार करण्याची प्राचीन खूण राखली पाहिजे!

## *पद्धती*

पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने चिन्हे, अद्‌भुत कृत्ये आणि चमत्कारांसह सुवार्तेचा प्रचार करणे ही सेवाकार्याच्या पद्धतीसाठी प्राचीन महत्त्वाची खूण आहे. येशूने हेच केले आणि हेच त्याने आपल्याला करणे शिकवले. शुभवर्तमानांमध्ये दृष्टांतांपेक्षा येशूने चमत्कार केल्याचे अधिक वर्णन आहे.

वस्तुतः, येशूने म्हटले:

**योहान 10:37,38**
**37 मी आपल्या पित्याची कृत्ये करत नसल्यास माझ्यावर विश्वास ठेवू नका;**

**[38] परंतु जर मी ती करतो तर माझ्यावर विश्वास न ठेवला तरी त्या कृत्यांवर विश्वास ठेवा; अशासाठी की, माझ्यामध्ये पिता व पित्यामध्ये मी आहे हे तुम्ही ओळखूण समजून घ्यावे."**

पौलाने म्हटले:

**1 करिंथ 2:4,5**

**[4,5] तुमचा विश्वास मनुष्यांच्या बुद्धिमत्तेवर उभारलेला नसावा तर देवाच्या सामर्थ्यावर उभारलेला दिसावा म्हणून माझे भाषण व माझी घोषणा ज्ञानयुक्त अशा मन वळवणाऱ्या  शब्दांची नव्हती, तर आत्मा व सामर्थ्य ह्यांची निदर्शक होती.**

ही आमची प्राचीन खूण आहे, आणि समाकालीन प्रचाराचे मूल्यमापन करण्यासाठी आम्हाला याचीच गरज आहे. कुशल वक्तृत्व आणि भव्य मल्टीमीडिया सादरीकरण तुम्हाला देवाच्या वचनाची सेवा करण्यासाठीच आहे असा विचार करून फसवू देऊ नका. येशू आमचा मानक आहे! त्याने म्हटले की वचनाचा प्रचार अद्‌भुत कृत्ये आणि अलौकिक चिन्हांसह असणे आवश्यक आहे. हा सर्वोत्तम "परिवर्तन अनुभव" आहे जो आम्ही लोकांना देऊ शकतो जेव्हा ते चर्चमध्ये येतात—अद्‌भुत चिन्ह चमत्कारांत अलौकिक गोष्टींचा सामना करण्यासाठी!

हीच दिशा आहे ज्याकडे आपण चर्च म्हणून गेले पाहिजे. येथेच आपण गेले पाहिजे!

तंत्रज्ञान आणि कालातीत सत्ये सांगण्याच्या सर्जनशील मार्गांचा अवलंब करणे चुकीचे नसले तरी, मला ही काळजी आहे की कुठेतरी आपण राज्याचे लक्ष्य गमावत आहोत, देवासोबत आमच्या नात्यात खोली नाही आणि त्याऐवजी, आम्ही गर्दीला आकर्षित करण्यासाठी व्यर्थ क्रयविक्रय आणि ढिसाळ विक्रयकलेकडे जात आहोत. आपल्या विश्वासाचा कर्ता आणि पूर्ण करणाऱ्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी

आपण व्यक्तिकेंद्रित होत आहोत (इब्री 12:2).

सेवेतील आपल्या हेतूमध्ये आणि पद्धतींमध्ये आपण नीतिमान असले पाहिजे. *“आम्ही करत असलेल्या सेवेत काही दोष दिसून येऊ नये म्हणून आम्ही कोणत्याही प्रकारे अडखळण्यास कारण होत नाही; तर सर्व गोष्टींत देवाचे सेवक म्हणून आम्ही आपली लायकी पटवून देतो; फार धीराने, संकटांत, विपत्तींत, पेचप्रसगांत,”* (2 करिंथ 6:3,4).

देवाचे सेवक या नात्याने, आपण आपल्या पाचारणास खरे राहू या—अलौकिक चिन्ह चमत्कारांसह देवाच्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यात वचनाचा प्रचार करण्यासाठी. बाकी जे काही आम्ही उपयोगात आणतो ते लोकांच्या अंतःकरणाप्रत सेतू बांधण्यात आमची मदत करण्यासाठी आहे, प्राचीन खुणांची जागा घेण्यासाठी नाही.

एपीसीचे पाळक आणि सेवापुढारी त्याच्या पवित्र आत्म्याच्या अभिषेकात आणि चिन्ह चमत्कारांच्या प्रदर्शनात देवाचे संपूर्ण, तडजोड न करणारे वचन सादर करण्यासाठी वचनबद्ध आहेत. आमचा असा विश्वास आहे की उत्तम संगीत, सर्जनशील सादरीकरणे, बुद्धिमत्तापूर्ण मतसमर्थन, समकालीन सेवकार्याच्या पद्धती किंवा नवीनतम तंत्रज्ञान कधीही चिन्हे, चमत्कार, अद्‌भुत कृत्ये आणि पवित्र आत्म्याची कृपादाने यांच्यासह पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने देवाच्या वचनाची सुवार्ता गाजविण्याच्या देवाच्या ठरविलेल्या पद्धतीची जागा कधीही घेऊ शकत नाही (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4).

आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तू शब्द आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत आणि आमचे ध्येय ख्रिस्तासारखी परिपक्वता आहे.

# 6
# समर्पणासाठी पाचारण

- प्राचीन खुणांनुसार जगण्यासाठी स्वतःला समर्पित करा.
- देव आणि त्याच्या वचनात सखोल पाया घालण्यासाठी स्वतःला समर्पित करा. देव आणि त्याचा शब्द कालातीत आहेत. देवाचा शब्द तो तराजू असला पाहिजे ज्याद्वारे तुम्ही प्रत्येक गोष्टीचे वजन कराल आणि तुमचे जीवन गुंतवण्यासारखे काहीतरी आहे की नाही हे पाहण्यासाठी; एखादी गोष्ट खरोखरच परमेश्वराच्या मानकांनुसार आहे की नाही हे पाहण्यासाठी तुमचे दशमान मोजणारी ती मोजपट्टी आहे; योग्य आणि अयोग्य काय हे ओळखण्यासाठी ज्याद्वारे तुम्ही पाहता त्या भिंगा. बदलाचे वारे वाहू देऊ नका ज्यामुळे तुम्हाला प्राचीन खुणांशी तडजोड करावी लागेल.
- लक्षात ठेवा काही पवित्र सीमारेखा आहेत ज्या ओलांडल्या जाऊ नयेत. ईश्वरीय परंपरा आहेत ज्या चालू ठेवल्या पाहिजेत. या प्राचीन खुणा "तुमच्या" जगात घेऊन जाण्यासाठी स्वतःला समर्पित करा.
- उपयुक्त असलेल्या बदलाच्या वाऱ्यांशी जुळवून घ्या आणि समायोजन करून घ्या.
- इतर सर्व क्षेत्रांमध्ये, प्राचीन खुणांद्वारे जगा!
- प्राचीन खुणा अचूकपणे प्रसारित करा.

वर्तमान पिढ्यांनो, मी तुम्हाला आग्रहाची विनंती करतो, ख्रिस्ती जीवन काय आहे हे यथार्थपणे दाखवून देणाऱ्या पद्धतीने जगण्यासाठी, बोलण्यासाठी, वागण्यासाठी स्वतःला समर्पित करा. आपण जे जीवन

जगतो तो असा, संदेश आहे जो आपण येणाऱ्या पिढीला देत असतो. या सांप्रत पिढीने हे सुनिश्चित केले पाहिजे की येणारी पिढी प्राचीन खुणांमध्ये आणखी निर्मिती करीत जाईल. उत्पत्तीचा नियम सांगतो की आपण आपल्या प्रतिरुपास जन्म देत असतो—आपण जे आहोत ते आपण पुनरुत्पादित करतो.

माझी इच्छा आहे की मला पुढच्या पिढीशी बोलता आले असते आणि त्यांना हे शिकविता आले असते की त्यांच्या मनांवर भडीमार करणारी सर्व माहिती कशी चाळून घ्यावी, योग्य आणि अयोग्य काय आहे हे कसे ओळखावे, तर किती बरे झाले असते. माझी इच्छा आहे की मला पुढच्या पिढीशी बोलता आले असते आणि त्यांना हे शिकविता आले असते की प्राचीन खुणांतर्गत कसे राहावे तर किती बरे झाले असते. माझी इच्छा आहे की मला पुढच्या पिढीशी बोलता आले असते आणि त्यांना हे शिकविता आले असते की योग्यप्रकारे मशाल कशी प्राप्त करावी—बंडखोरीचा स्वर न काढता (अबशालोमाने जी चूक केली ती न करता) आणि अपरिपक्वेच्या स्वरावाचून (रहूबियामाने जी चूक केली ती न करता) तर किती बरे झाले असते. पण मग ही सांप्रत पिढी, आपण, जर प्राचीन खुणांच्या आत जगू, तर त्यांच्या प्रतिक्रिया अशा काही आहेत ज्यांस आपण आपल्या उदाहरणांद्वारे आकार देऊ शकतो!

देवामध्ये अधिक उंच आणि खोलवर जा, परंतु ठरविलेल्या प्राचीन खुणांचे उल्लंघन करू नका!

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि

देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखववायास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय*

*केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक भावनिक /** |
| **शिक्षेतील उणीव** | **अडचणी** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **तणाव/आघात** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **आध्यात्मिक समस्या** |
| | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout, Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.


**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

प्राचीन खुणा हा एक संदेश आहे जो मी काही काळापासून माझ्या हृदयात घेऊन वावरत आहे, जो मी आता या पुस्तकाद्वारे तुमच्यापर्यंत पोहोचवित आहे. हा कदाचित असा संदेश आहे जो मी आपल्या सेवाकार्याचा अधिकार दंड पुढच्या पिढीला सोपवितांना कदाचित शेवटचा संदेश म्हणून प्रचार करेन, ज्या ठिकाणी मी आपली धाव सोडली आहे तेथून ते ती धाव पुढे सुरू ठेवू शकतील.

जग बदलत आहे. काल जे कामी आले ते कदाचित आज काम करणार नाही! आपल्याला जुळवून घेण्याची गरज आहे. नवीन जगाचा भाग असलेली चिन्हे आणि भाषा यांचा वापर करून आपल्याला सार्वकालिक सत्ये मांडण्याची गरज आहे. आणि तरीही असे करण्यात धोके आहेत, ज्याची आपल्याला जाणीव असणे आवश्यक आहे. आपण संस्कृतीतून वाटेल त्या गोष्टी घेऊ शकत नाही आणि कालातीत सत्ये इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांचा उपयोग करू शकत नाही. तथापि, नवीन जगाची संस्कृती वापरण्याच्या, कामी लावण्याच्या आणि उपयोगात आणण्याच्या आमच्या प्रयत्नात आम्ही प्राचीन खुणांशी तडजोड करू शकत नाही

काही बदलाचे वारे वाहत आहेत. ज्याला आपण आपल्या पालांशी जुळवून घेणे आवश्यक आहे आणि वारा वाहत असलेल्या ठिकाणी जाणे आवश्यक आहे नाहीतर आपण मागे राहून जाऊ आणि सध्याच्या नवीन जगापासून दूर होऊ. आणि मग बदलाचे काही वारे आहेत जे अशा दिशेने वाहू लागले आहेत ज्या आम्हाला आमच्या पवित्र सीमा ओलांडण्यास आणि ईश्वरीय परंपरा गमाविण्यास प्रेरित करतील. आम्हाला वादळातून बाहेर काढण्यासाठी आपण प्राचीन खुणांचा उपयोग करण्याद्वारे त्यामधून मार्ग काढायला शिकले पाहिजे.

**बायबल वाचा**—जे आमची प्राचीन खूण—लँडमार्क आहे!

All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org